पिंपरी चिंचवड महानगरपालिका
**ग** प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक – ८
(विशेष सभा)
सभावृत्तांत

दिनांक - १४/२/२०१८ वेळ - **सकाळी** ११:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ग** प्रभाग समितीची विशेष सभा **बुध**वार दि.१४/**०२**/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **"ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह"** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.श्री.अभिषेक गोविंद बारणे – सभापती**
२. मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे
३. मा.पवार मनिषा प्रमोद
४. मा.बारणे अर्चना तानाजी
५. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
६. मा.भोसले सचिन सुरेश
७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८. मा.निलेश हिरामण बारणे
९. मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन
१०. मा.सविता बाळकृष्ण खुळे
११. मा.सुनिता हेमंत तापकीर
१२. मा.चंद्रकांत बारकु नखाते

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

**श्रीमती स्मिता झगडे – क्षेत्रिय अधिकारी, श्री.**श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, श्री.एस.एस.कुलकर्णी – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.ओंभासे पी एस – कार्यकारी अभियंता,श्री.संदेश चव्हाण – कार्यकारी अभियंता (विद्युत) श्री.बोनगीर ए. एम – लेखाकारी, श्री.दिलीप धुमाळ – उप अभियंता,विद्युत, श्री.नितीन निंबाळकर , श्री ओहोळ व्ही.बी. - उपअभियंता स्थापत्य, श्री.साबळे बी आर-उपअभियंता, श्री.मोहिते एस एस – उपअभियंता जलनि:सारण, श्री.कलाल इ.के,श्री.कोरेवार एम बी, श्री.गजपुरे व्ही पी, श्रीम.सानप ए.व्ही, श्रीम.घोडके पी पी – कनिष्ठ अभियंता स्थापत्य,श्री.सतिष तायडे – विद्युत, श्री.बंडगर एस बी – जलनि:सारण, श्री.संदिप मो.पाडवी – कनिष्ठ अभियंता पाणीपुरवठा, श्री.मगर एस एम – कनिष्ठ अभियंता इ. कर्मचारी उपस्थित होते.

-----

**मा.सभापती-** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

प्रशासन अधिकारी तथा सचिव यांनी कार्यपत्रिकेवरील विषय मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने बैठकीत सादर केला.

-------

ठराव क्रमांक - ३८ विषय क्रमांक- १

दिनांक- १४/०२/२०१८ विभाग – प्रशासन विभाग

**संदर्भ –** ग क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.गक्षेका/नि०३/कावि/८६/२०१८ दिनांक – ७/०२/२०१८

ग क्षे त्रिय कार्यालयाकडील सन २०१७ – २०१८ चे सुधारीत व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रक मा.प्रभाग समितीसमोर अवलोकनार्थ सादर करणेत आले. सदर प्रस्ताव मा.ग प्रभाग समिति सर्व सदस्यांनी अमान्य केला.

------

दि. १४/०२/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे विशेष सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.

मा.चंद्रकांत नखाते – ग क्षेत्रिय कार्यालयाची अंदाजपत्रकाची ही पहिलीच मिटींग असुन सदर मिटींगसाठी सर्व कार्यकारी अभियंता व संबंधित अधिकारी यांची उपस्थिती असणे गरजेचे आहे. परंतु असे असतांनाही जलनि:सारण व पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी मिटींगसाठी नेहमी अनुपस्थीत असतात. क्षेत्रिय अधिकारी यांनी संबंधित अधिका-यांना नोटीस द्यावी. मुख्यालय सोडुन प्रभाग निहाय किती कामे काढली याची माहिती नगरसदस्यांना देणेत यावी. पाणीपुरवठयाच्या संदर्भात किरकोळ कामांनाही तरतुद शिल्लक नसते, असे असतांना यावर्षीही तरतुद का दिली नाही, याची सविस्तर माहिती देणेत यावी.
सदर अंदाजपत्रक विशेष सभेत पाणीपुरवठयाचे कार्यकारी अभियंता श्री.तांबे व जलनि:सारणचे कार्यकारी अभियंता श्री.गट्टुवार हे दोन अधिकारी गैरहजर होते व मागील कोणत्याही सभेला हे अधिकारी उपस्थित राहत नाही , त्यामुळे आमच्या या विभागाविषयी असणा-या शंकांचे निरसन होत नाही.

श्रीमती स्मिता झगडे – मिटींगसाठी गैरहजर असणा-या अधिका-यांना नोटीस देणेत आलेली आहे. तरीही पुढील मिटींगसाठी सर्व अधिकारी हजर असतील.

मा.निलेश बारणे - वॉर्डस्तरीय निधी दिला गेला तरच कामे होतात, असे असतांना मुख्यालयाकडे निधी दिला जातो.

मा.अभिषेक बारणे – मुख्यालय सोडुन प्रभाग निहाय किती कामे काढली आहेत याची सविस्तर माहिती देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ग क्षेत्रिय कार्यालयाचे सन २०१७ – २०१८ चे सुधारित व सन २०१८ – २०१९ चे मुळ अंदाजपत्रकामध्ये सादर केलेल्या अंदाजपत्रकाचे सभेमध्ये अवलोकन केले असता, ग क्षेत्रिय कार्यालय पाणीपुरवठा विभाग व जलनि:सारण विभाग यांनी प्रभाग समितीला असलेल्या अधिकारांनुसार रक्कम रुपये १० लाखापर्यंतची कामे घेतलेली नाहीत तसेच या क्षेत्रिय कार्यालयांतर्गत असणा-या प्रभागांना समान प्रकारची

तरतुद उपलब्ध करुन देणेत आलेली नाही. सबब ग क्षेत्रिय कार्यालयाचे अंदाजपत्रकात पुरेशी तरतुद करुन देणेत यावी. सदर प्रस्ताव आम्ही अमान्य करत आहोत.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

अध्यक्ष
ग प्रभाग समिती
थेरगाव– ३३.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/४/ /२०१८
दिनांक - /०२/२०१८

प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
क्षेत्रीय कार्यालय,
थेरगाव – ३३

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२/- आपले विभागाशी संबंधित असणा-या विषयाबाबत झालेल्या ठरावानुसार कार्यवाही करणेत यावी.